# परिशिष्ट-4

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग,
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय
पत्ता:- सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६००३
ई-मेल:- eemdkop@gmail.com
दुरध्वनी क्र. :- (०२३१) २६५१२८४

## निविदा सुचना क्र. २३ सन २०२४-२०२५

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे खाली नमूद केलेल्या कामाचा पुर्वानुभव असलेल्या सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ब-1 नमुन्यात (ऑफलाईन) निविदा मागवित आहेत. शासन जलसंपदा विभाग निर्णय क्र. संकीर्ण/1117/ प्र.क्र.104/17/यांत्रिकी, दि.14/03/2018 अन्वये "निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही." निविदा कागदपत्रे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर येथे रु. 1,000/- (रु. एक हजार मात्र) + रु. 180/- (*रु. एकशे एशी मात्र*) (18% *वस्तू व सेवा कर*) (ना परतावा) इतकी फी रोखीने भरुन मिळतील. पोस्टाने निविदा संच हवे असल्यास अतिरीक्त रु. 100/- (*रु. शंभर मात्र*) (ना परतावा) भरावे लागतील. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| *कामाचे नाव :-* | कासारी मध्यम प्रकल्प ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील आपत्कालीन द्वार परिचलनाकरीता आवश्यक विद्युत पुरवठा प्रणालीचे काम. |
| जिल्हा :- | कोल्हापूर |
| निविदेची अंदाजित किंमत रुपये :- | **रु. 4,23,361/-** (रु. चार लक्ष तेवीस हजार तीनशे एकसष्ट रुपये फक्त) (वस्तु व सेवा कर वगळून) |
| कोऱ्या निविदा संच विक्री कालावधी :- | दिनांक :- 13/01/2025 रोजी सकाळी 11.00 वा. पासुन<br>दिनांक :- 20/01/2025 रोजी सायंकाळी 17.45 वा. पर्यंत |
| भरलेल्या निविदा सादर करणेचा कालावधी :- | दिनांक :- 13/01/2025 रोजी सकाळी 11.00 *वा.* पासुन<br>दिनांक :- 22/01/2025 रोजी सायंकाळी 17.45 वा. पर्यंत |
| निविदा उघडणेचा कालावधी :- | दिनांक :- 23/01/2024 रोजी सकाळी 11.00 वा. (शक्य झाल्यास) |

खालील ठिकाणी निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

1) संकेतस्थळ :- www.mahayantriki.org and www.wrd.maharashtra.gov.in
2) निविदेमध्ये काही बदल होत असल्यास असे बदल फक्त या कार्यालयाचे सूचनाफलकावर आणि वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील (वृत्तपत्रात प्रसिध्द केले जाणार नाही.)
3) निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.

जा.क्र. यांविको/लेशा-1/ ५६ /सन 2024
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय,
दि. :- 03 JAN 2025

(सु.म.कामेवाडी)
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी विभाग, कोल्हापूर.

प्रत :- मा. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, कोल्हापूर यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सविनय सादर.
2/- वरील प्रमाणे या विभागाची सोबत जोडलेली निविदा सुचना वेबसाईटवर प्रसिध्दीस देणविषयी व सुचना फलकावर लावणे विषयी विनंती.
प्रत:- उप अभियंता, प्रादेशिक कर्मशाळा उपविभाग क्र.2, कोल्हापूर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत:- लेशा-2 (विभागीय कार्यालय) यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत:- व.ले.ली (विभागीय कार्यालय) यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत:- नोटीस बोर्ड (विभागीय कार्यालय).
प्रत :- कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणीकरण विभाग, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
2/- कृपया सोबतची निविदा सुचना जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी ही विनंती.



Scanned by CamScanner